**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VI | ISSUE-XII | DECEMBER | 2019 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 5.707 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा एक भौगोलिक अभ्यास

**शहाजी गंगाराम मरशिवणे**
सहाय्यक प्राध्यापक भूगोल विभाग
कै.बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

लोकसंख्या भुगोल ही एक मानवी भुगोलाची महत्वाची शाखा आहे. लोकसंख्या भुगोलात मानवी लोकसंख्या शास्त्रीय घटकांचा अभ्यास केला जातो. जसे. जन्मदर, मृत्यूदर, लोकसंख्या वाढ लोकसंख्येचे धर्मनिहाय वितरण, साक्षरता दर आणि स्त्री-पुरुष प्रमाण दर इ.

आज लोकसंख्यावाढ ही एक वैश्विक समस्या बनत चाललेली आहे. कारण जगाची लोकसंख्या ०८ (आठ) अब्जाच्या जवळपास पोहचलेली असुन एवढया मोठया लोकसंख्येच्या अन्नविषयक आणि ईतर महत्वाच्या गरजा भागविणे गरजेचे असते. भारताची एकूण लोकसंख्या २०१९ मधील जुन महिन्यापर्यंत १३६ कोटीच्या जवळपास आहे (च्दृद्वद्धड़ड्ढ : ज़्दृद्धथ्डथ्ड्ढद्यड्ढद्ध.ड़दृ) जी जगाच्या एकूण लोकसख्येंच्या (१८) टक्के च्या जवळपास असुन एकूण क्षेत्रफळाच्या (२.४ टक्के) प्रमाणाच्या तुलनेत कितीतरी पटींनी अधिक आहे ज्यामुळे भविष्यात लोकांच्या मुलभूत गरजा भागविण् अवघड होत जाणार आहे. धर्म म्हणजे माणसाने स्वीकारलेली एक विशिष्ट विचारसरणी होय. प्रत्येक धर्माचे स्वतःचे जीवन विषयक तत्त्वज्ञान असते. प्रत्येक धर्माच्या अनुयायांना जीवनाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टीकोन असतो. जागातील सर्वधर्म कुटूंबनियोजनाच्या विरोधात आहेत विशेषतः इस्लाम व ख्रिश्चन धर्मातील कॅथॅलिक पंथीय कुटूंबनियोजनाला तीव्र विरोध करतात व आपत्यजन्म थांबविणे, पाप मानतात, थोडक्यात समाजावरील धार्मिक पगडयानुसार जन्मदरांमध्ये भिन्नता आढळते उदा. भारतात राहणारे हिंदू व मुस्लिम एकाच प्रकारच्या पर्यावरणात राहत असले तरी त्यांच्यातील जन्मदरांत फरक आहे. हिंदुची लोकसंख्या १९६१ साली एकुण लोकसंख्येच्या ८३.४८ टक्के होती, ती १९८१ साली ८२.६ टक्के झाली याउलट मुस्लीमांची संख्या १९६१ साली १०.६९ टक्के होती ती १९८१ साली ११.४ टक्के झाली म्हणजेच हिंदुच्या व मुस्लीमांच्या जन्मदरात फरक असलेला दिसून येतो




अभ्यास क्षेत्र :-

भारत उत्तरपूर्व गोलार्धात दक्षिण आशिया खंडात स्थित आहे. भारताचा अक्षवृत्तीय विस्तार उत्तर ते उत्तर अक्षवृत्ता दरम्यान पसरलेला असून रेखावृतीय विस्तार पूर्व ते पूर्व रेखावृत्त दरम्यान पसरलेला आहे भारताच्या मध्यातून उत्तर अक्षवृत्त म्हणजेच कर्कवृत्त गेले आहे. जगातील एकूण क्षेत्रफळाच्या २.४६ टक्के एवढा प्रदेश भारताने व्यापला असुन, क्षेत्रफळानूसार भारताचा सातवा (७) क्रमांक लागतो

**उद्देश :-**

१. भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा आढावा घेऊन संख्यात्मक विश्लेषण करणे.
२. धार्मिक रुढी व परंपरा आणि अशिक्षितपणाचा जन्मदरावर आणि लोकसंख्या वृध्दीवर होणारा परिणाम दाखवून देणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत व अभ्यास पध्दती :-**

भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येच्या विश्लेषणासाठी दुय्यम आकडेवारीचा आधार घेतला असून द्वितीयक सामुग्रीमध्ये भारत सरकारद्वारा २०११ साली तयार करण्यात आलेल्या जनगणना अहवालाचा आधार घेण्यात आलेला आहे. तसेच विविध मासिके आणि संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आलेला असून मिळालेल्या आकडेवारीच्या सहाय्याने सांख्यिकीय पध्दतीने विश्लेषण केलेले आहे.

**विषय विवेचन :-**

धर्मनिहाय लोकसंख्या म्हणजे एका विशिष्ट प्रदेशात धर्मानूसार वास्तव्यास असलेल्या अनुयायांची संख्या होय


२०११ सालाच्या जनगणनेनुसार भारताची एकुण लोकसंख्या १२१ कोटी असून जगाच्या एकुण लोकसंख्येच्या १७.७० टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्यास आहे तर लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा क्रमांक जगात दुसरा (०२) लागतो.

जागतिक पातळीवरील धर्मनिहाय लोकसख्येंचा विचार करता २०१२ नुसार सर्वाधिक लोकसंख्या ख्रिश्चन धर्माची असून ती जगाच्या एकुण लोकसंख्येच्या ३१.८ टक्के इतकी आहे. त्याखालोखाल अनुक्रमे मुस्लीम २४.४ टक्के, धर्म न सांगणारे १५.४ टक्के, हिंदू १५.० टक्के, बध्दीष्ट ६.७ टक्के आणि स्थानविशिष्ट असे स्थानिक धर्म ५.७ टक्के या धर्माच्या लोकसंख्येचा क्रमांक लागतो

भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा आढावा घेण्यासाठी खालील आकडेवारी २०११ च्या जनगणनेनुसार लक्षात घेणे गरजेचे आहे.

**भारतातील धर्मनिहाय लोकसंख्या २०११**

| अक्र | धर्माचे नाव | लोकसंख्या | एकुण लोकसंख्येतील प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | ९६.६२ कोटी | ७९.८० |
| २ | मुस्लीम | १७.२२ कोटी | १४.२३ |
| ३ | ख्रिश्चन | २.७८ कोटी | २.३० |
| ४ | शिख | २.०८ कोटी | १.७२ |
| ५ | बुध्दीष्ट | ८४.४३ लाख | ०.७० |
| ६ | जैन | ४४.५२ लाख | ०.३७ |
| ७ | इतर धर्म | ७९.३८ लाख | ०.६६ |
| ८ | धर्म न सांगणारे | २८.६७ लाख | ०.२४ |




वरील आकडेवारीचे विश्लेषण केले असता आपणांस असे दिसुन येते की, भारतात हिंदु धर्माची लोकसंख्या ९६.६२ कोटी इतकी असुन ती एकुण लोकसंख्येच्या ७९.८० टक्के आहे. तर त्या खालोखाल मुस्लीम धर्माच्या लोकसंख्येचा क्रमांक येत असून त्यांची लोकसंख्या १७.२२ कोटी एवढी असून ती एकुण लोकसंख्येच्या १४.२३ टक्के इतकी आहे. त्यानंतरचा क्रमांक म्हणजे तिसरा, चौथा, पाचवा आणि सहावा अनुक्रमे ख्रिश्चन,शिख, बुध्दीष्ट आणि जैन धर्माचा लागतो.

भारतात जवळपास ७९.३८ लाख लोकसंख्या जे की एकुण लोकसंख्येच्या ०.६६ टक्के लोकसंख्या इतर धर्माची असून त्यात पारसी व अनेक प्रकारच्या स्थानिक धर्मांचा समावेश होतो. यातील पारसी धर्माच्या लोकसंख्येचा वृध्दीदर ऋणात्मक रितीने वाढत असल्याचे दिसुन येते.

वरील आकडेवारीत मुस्लीम धर्माची लोकसंख्या १७.२२ कोटी असल्याचे दिसुन येत असून ती एकुण लोकसंख्येच्या १४.२३ टकके आहे तर २००१ नुसार मुस्लीम धर्माची एकुण लोकसंख्या १३.८१ कोटी होती जी एकुण लोकसंख्येच्या १३.४ टक्के होती तर हिंदू धर्माची लोकसंख्या २०११ साली एकुण लोकसख्येच्या ७९.८० टक्के झाली जी २००१ साली एकुा लोकसंख्येच्या ८०.५ टक्के होती तसेच १९९१ सालचा विचार करता भारतातील हिंदू धर्माची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या ८१.६१ टक्के होती तर मुस्लीम धर्माची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या १२.६१ टक्के होती म्हणजेच मुस्लीम धर्माची लोकसंख्या ही हिंदू धर्माच्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी अधिक पटींनी वाढत आहे म्हणजेच मुस्लीम धर्माच्या लोकसंख्येचा जन्मदर हिंदु धर्माच्या लोकसंख्येच्या जन्मदरापेक्षा अधिक असलेला दिसून येतो.

याचे कारण म्हणजे वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक धर्माचे स्वतःचे जीवनविषयक तत्त्वज्ञान असते मुस्लीम धर्मात कुटूंब नियोजनाला तीव्र विरोध करतात व अपत्यजन्म थांबविणे पाप मानतात. तसेच निरक्षरता किंवा कमी शैक्षणीक पातळीमुळेही मुस्लीम समाजातील जन्मदर अधिक असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

भारतात सर्वाधिक लोकसंख्या हिन्दु व मुस्लीम धर्माची वास्तव्यास असून त्यांची एकूण लोकसंख्येतील प्रमाण जवळपास ९५ टक्के आहे या धर्मांच्या लोकसंख्येचा जन्मदर कमी करण्यासाठी कुटूंब नियोजनाबद्दल जनजागृती करणे गरजेचे आहे. तसेच शिक्षणाचे प्रमाण वाढवुन लोकांवरील धर्माचा प्रभाव कमी करणे जेणेकरुन लोक कुटूंबनियोजन कार्यक्रमाला चालना देऊन स्वीकार करतील तसेच काही धर्म जे लुप्त होण्याच्या परिस्थितीत आहे उदा.पारसी धर्म (एकुण लोकसंख्येच्या ५७२६४ फक्त) अशा धर्माची लोकसंख्या वाढविण्यासाठी जन्मदर वाढविणे, त्यांना आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**

१. www.censusindia.gov.in/2011
२. Population geography- Dr.R.C.Chandana
३. लोकसंख्या आणि वस्ती भुगोल, प्रा.मुसमाडे , प्रा.सोनवणे, प्रा.मोरे